दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १६६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.१६ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# जे व्हायला नको होतं, ते झालं, आता चर्चा करणे निरर्थक : शरद पवार

## वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्पावरून शिंदे-फडणवीस सरकारला सुनावले

**दै.रायगड नगरी । पुणे**

**वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प महाराष्ट्राला न मिळता गुजरातला गेल्यामुळे शिंदे-फडणवीस सरकारवर जोरदार टीका होत असताना आता राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही सरकारला खडेबोल सुनावले आहेत. फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेला आहे आणि आता तो काही परत येईल अशी शक्यता नाही. त्यामुळे या चर्चा आता बंद करुन नवीन काय करता येईल ते पाहायला हवं. खरंतर आधीच्या सरकारमध्ये उदय सामंत आणि एकनाथ शिंदे मंत्री होते आणि तेच आता आरोप करताहेत. महाराष्ट्राला सक्षम नेतृत्वामुळे गुंतवणूक मिळायची, अशी टीका शरद पवार यांनी केली आहे. ते पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते.**

हा प्रकल्प तळेगावला येणार होता, त्याची चर्चा झाली होती. राज्य सरकारनं जे काही आवश्यक आहे त्या निर्णयाची तयारी ठेवली होती. पण नंतर याच्यात बदल झाला, त्याच्यात आता काय फायदा दिसत नाही. काही लोकांनी निर्णय बदलावा असं सांगितलं, महाराष्ट्रात आणावा असं काही जण म्हटले पण तसं होणार नाही. महाराष्ट्रातील प्रकल्प बाहेर जायला नको होता, बाहेर गेला आहे आता त्यावर चर्चा करण्यात अर्थ नाही.

मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री दोघांनी पाठी मागच्या सरकारच्या काळात यावर निर्णय घेतला नसल्याचं वक्तव्य केलं. उद्धव ठाकरेंचं सरकार जबाबदार आहे, असं ते म्हणाले. मात्र, ठाकरेंच्या मंत्रिमंडळात एकनाथ शिंदे आणि उदय सामंत होते. दोघे त्या मंत्रिमंडळात होते मात्र त्यांनी असे आरोप करणे शहाणपणाचं लक्षण नाही, असा सल्ला शरद पवार यांनी लगावला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतच्या चर्चेचा दाखला देण्यात आला. या प्रकल्पाशिवाय दुसरा मोठा प्रकल्प देऊ असं सांगण्यात आलं. लहान मुलांची समजूत काढावी, असा तो प्रकार आहे त्यामध्ये महाराष्ट्राची प्रतिष्ठा नाही, त्यामुळं याच्यावर चर्चा करण्याची गरज नाही, असं शरद पवार यांनी म्हटलं.

तळेगाव हा जो स्पॉट आहे त्याच्या



जवळ असलेला चाकण हा भाग देशातील ऑटोमोबाइलचा भाग आहे. चाकण, राजंणगावचा कॉरिडॉर तयार करण्याचा प्रयत्न होता, त्यामध्ये माझा देखील सहभाग होता. ती कंपनी तळेगावला आली असती तर सोयीचं झालं असतं. मात्र, कंपनीनं निर्णय घेतलाय हे काही नवीन नाही.

हा प्रकल्प वेदांता नावाच्या ग्रुपचा त्याचे मालक अग्रवाल यांनी हा निर्णय घेतला. हा त्यांचा अधिकार आहे. मला त्यात काय नवीन वाटत नाही. या देशात एक अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प रत्नागिरीत करण्याचा निर्णय झाला होता. तो प्रकल्प वेदांतांचा होता. त्यावेळी स्थानिकांचा थोडा विरोध झाला की त्यांनी तो चेन्नईला नेला होता. ही जुनी गोष्ट आहे. वेदांतांच्याकडून ही पहिली गोष्ट झालेली नाही. त्यामुळं वेदांतांचा प्रकल्प येत असेल तर शेवटपर्यंत त्याची खात्री देता येत नाही, असं शरद पवार म्हणाले.

जे व्हायला नको होतं, ते झालं आहे. आता त्यावर चर्चा बंद करणं आवश्यक आहे, असं शरद पवार म्हणाले. उद्योजक ज्यावेळी गुंतवणुकीचा विचार करायचे त्यावेळी ते महाराष्ट्राला पहिलं प्राधान्य द्यायचे, असं शरद पवार म्हणाले.

राज्यातील सरकारच्या कारभाराबाबत पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना पवार म्हणाले की, मला या सरकारचा कारभार काही दिसला नाही. परंतु गतीमान राज्य आहे हे मात्र दिसतंय. कारण राज्य प्रमुख हे अधिक गतीने सगळीकडे जात आहेत आणि राज्य समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. याच्या शिवाय दुसरं मला काहीच दिसत नाही.

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि काँग्रेस पक्ष आघाडी म्हणून एकत्र लढवणार का, असा प्रश्न पवार यांना विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना पवार म्हणाले की, निवडणूकांबाबत राज्याच्या नेत्यांना विचारा. मला ठाऊक नाही. मी त्यात पडत नाही. अजित पवार, उद्धव ठाकरे आणि बाळासाहेब थोरात हे त्या-त्या पक्षाचे प्रमुख नेत्यांना त्यांच्या सहकाऱ्यांची मनस्थिती काय हे त्यांना जास्त ठाऊक आहे. त्यामुळे ते निर्णय घेतील.

> महाराष्ट्राच नवीन शब्द खोके असा शब्द सध्या प्रचलिच झालेला आहे. या पूर्वी असे कधी ऐकले नव्हते. गोवा, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात गट किंवा आमदार फोडून सरकार स्थापन करण्यात आले. साधन संपत्ती आणि सत्ता याचा वापर करून स्थिर सरकार अस्थिर करायची आणि आपल्याला हवं तसं करायचं हा नवीन कार्यक्रम केंद्रातील सत्ताधारी पक्षाने हाती घेतला आहे. असे यापूर्वी कधीही घडलेले नाही.

# डोळ्यात तरळणारे आनंदाश्रू हेच आमच्या परिश्रमाचे फलित : बिपिन कुमार सिंह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ २ मधील मुद्देमाल हस्तांतरण आणि आयएसओ मानांकन प्रमाणपत्र वितरण सोहळा येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके येथे आयोजित करण्यात आला होता. गुरुवार दिनांक १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह यांच्या अध्यक्षतेखाली शानदार सोहळा संपन्न झाला. पोलीस सह आयुक्त डॉ. जय जाधव आणि अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे विभाग महेश घुर्ये यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली. पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ दोन अंतर्गत दहा पोलीस ठाण्यांमध्ये १ जानेवारी २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२२ दरम्यान दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांमध्ये एकूण ८ कोटी ८८ लाख सत्तर हजार दोनशे तेहत्तीस रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्याची अतिशय उत्कृष्ट कामगिरी करण्यात आली आहे. हस्तगत करण्यात आलेल्या मुद्देमालापैकी ४ कोटी ४९ लाख ७२



हजार २६४ किमतीचा मुद्देमाल न्यायिक प्रक्रिया पूर्ण करून संबंधित फिर्यादी व्यक्तींना हस्तांतरित करण्यात आले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह म्हणाले की, गुन्हे अन्वेषणातून हस्तगत करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये रोख रक्कम, किमती वस्तू, मूल्यवान दाग दागिने आहेत. परंतु यात काही दागिने असे असतात की ज्यांचे नागरिकांसोबत अत्यंत संवेदनशील नाते निर्माण झालेले असते. काही दागिने वंशपरंपरागत पद्धतीने चालत येऊन आपल्यापाशी आलेले असतात. अशा वस्तूंची चोरी झाली की पूर्वजांची निशाणी हरवल्याचे दुःख हे चोरीपेक्षा कित्येक पटींनी अधिक असते. असे दागिने परत केल्यानंतर फिर्यादींच्या डोळ्यांमध्ये जे आनंदाश्रू तरळत आहेत तेच आमच्या खात्याने घेतलेल्या परिश्रमाचे खरे फलित आहे असे मला वाटते.

गुगल ग्लोबल कंपनीच्या वतीने खडज मानांकन परीक्षण करण्यात आले. सदर आस्थापनाचे मुख्याधिकारी श्रीबास दत्ता आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, जनसेवेसाठी तहान भूक हरपून

…/२

# पमपाला 'अमृत २' साठी केंद्राकडून सव्वा चारशे कोटी मंजूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेतील 'अमृत २' या अभियानंतर्गत राबवण्यात येत असलेल्या चार महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी ४२४ कोटी १७ लाख रूपये केंद्र सरकारने मंजूर केले आहेत. याबाबत २० सप्टेंबर पर्यंत शासकीय निर्णय मंजूर होऊन पनवेल महापालिकेला निधीही उपलब्ध होईल, असा विश्वास पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी व्यक्त केला आहे.

पनवेल महापालिकेच्या स्थापनेसाठी माजी मुख्यमंत्री आणि आत्ताचे उपमुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस यांनी पुढाकार घेतला आणि त्यामुळे महाराष्ट्रातील सगळ्यात तरुण महापालिका निर्माण झाली आता या महापालिका हद्दीत सर्व पद्धतीच्या सोयी सुविधा पुरवण्यासाठी देखील त्यांनी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमृत योजनेचा फायदा पनवेल महापालिका हत्तीला करून देण्याच्यासाठी पुढाकार घेतला आहे त्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी पनवेल महापालिका हद्दीतील ग्रामीण भागात पाणीपुरवठा तसेच सांडपाण्याच्या निचरा करण्यासाठी जसा पुढाकार घेतला आहे त्याच पद्धतीने भविष्यकाळात शहरांमधील सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी अमृत योजनेचा फायदा पनवेल महापालिकेला मिळेल, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर हे देखील पुढाकार घेतील असा आम्हाला विश्वास आहे, असे परेश ठाकूर यावेळी म्हणाले.

पनवेल महानगरपालिकेच्या 'अमृत २' या अभियानांतर्गत चार प्रकल्प राबविण्यात येत आहेत. पहिल्या प्रकल्पात, पमपा क्षेत्रातील २९ गावांकरीता होणाऱ्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत माणशी १३५ लिटर पाणी प्रतिदिन उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या या प्रकल्पासाठी १५४ कोटी ४९ लाख रूपये मंजूर केले आहेत. दुसऱ्या प्रकल्पानुसार पमपा क्षेत्रातील २९ गावांकरीता मलनि:स्सारण योजनेतील मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे आणि मलनि:स्सारण प्रक्रिया केंद्र बांधणे. यासाठी २०६ कोटी ७५ लाख रूपये मंजू करण्यात आले आहेत. तिसऱ्या प्रकल्पानुसार पनवेल शहरासाठी (१५.५० दलली चा) अतिरिक्त एस.टी.पी. प्लांट बांधण्यासाठी ५२ कोटी २० लाख रूपये मंजूर करण्यात आले आहेत. चौथ्या प्रकल्पानुसार पमपा क्षेत्रातील पिसार्वे गावातील तलावाचे सुशोभीकरण करणे, गाळ काढणे आणि पाण्याचा दर्जा उंचावण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी १३ कोटी ७३ लाख रूपये केंद्राकडून मंजूर करून घेण्यात आले आहेत, असेही परेश ठाकूर यांनी यावेळी सांगितले. एखाद्या प्रकल्पासाठी केंद्र सरकार जेव्हा निधी उपलब्ध करून देते तेव्हा राज्य सरकारलाही आपला वाटा द्यावा लागतो. आताच्या बदललेल्या परिस्थितीत राज्य सरकारही आपला वाटा देईल. तसेच महानगरपालिकाही आवश्यक तो हिस्सा निश्चितच भरेल, अशी ग्वाहीही परेश ठाकूर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.

विकासाची गंगा पुढे नेण्याच्याच हेतुने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा

…/२

# सिडकोमध्ये अभियंता दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सिडको महामंडळाचे मुख्यालय असलेल्या सिडको भवन येथे १५ सप्टेंबर २०२२ रोजी अभियंता दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको इंजिनिअर्स असोसिएशनतर्फे अभियंता दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारतरत्न सर एम. विश्वेश्वरैया यांच्या जयंतीनिमित्त देशभर अभियंता दिन साजरा करण्यात येतो. सर एम. विश्वेश्वरैया यांनी अनेक समाजोपयोगी प्रकल्पांकरिता दिलेल्या



योगदानामुळे १५ सप्टेंबर हा त्यांचा जन्मदिन देशभर अभियंता दिन म्हणून साजरा करण्यात येते.

या कार्यक्रमास अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, डॉ. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस उपमहानिरीक्षक तथा मुख्य दक्षता अधिकारी, सिडको, के. एम. गोडबोले, मुख्य अभियंता (नवी मुंबई), सिडको, आर. बी. धायटकर, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ), सिडको, एन. सी. बायस, अतिरिक्त मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प), सिडको, पी. एम. सेवतकर, अधीक्षक अभियंता (पालघर व नगर रचना-१) सिडको तथा अध्यक्ष, सिडको, सिडको, फैयाज खान, व्यवस्थापक (कार्मिक), इंजिनिअर्स असोसिएशन, विनोद पाटील, अध्यक्ष, सिडको एम्प्लॉईज युनियन यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात एम. विश्वेश्वरैय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व सिडको आर्टिस्ट कंबाईनमधील कलाकारांनी सादर केलेल्या स्वागतगीताने झाली.

या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना अश्विन मुद्गल यांनी सिडकोतील अभियंत्यांना अभियंता दिनाच्या शुभेच्छा देत एम. विश्वेश्वरैय्या यांच्या कार्याबरोबरच त्यांनी जपलेली मुल्येही आजच्या अभियंत्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. अन्य मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना सिडकोतील अभियंत्यांनी विविध प्रकल्पांकरिता

…/२

# महिलांचे सोनसाखळी चोरी करणाऱ्या २ आरोपींना तळोजा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाकडून अटक

## सुमारे ८.५ लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महिलांचे सोनसाखळी चोरी करणाऱ्या २ आरोपींना तळोजा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाकडून अटक करून त्यांच्याकडून सुमारे ८.५ लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. या आरोपींच्या अटकेमुळे ९ गुन्हे उघडकीस आले आहेत.

शहराची वाढती व्याप्ती व वाढती लोकसंख्या, नवनवीन वसाहतींची निर्मीती यासोबतच नवी मुंबई आयुक्तालयामधुन अनेक सोनसाखळी चोरीच्या वाढत्या तकारी पोलीस ठाण्यांमध्ये प्राप्त झाल्या होत्या. सोनसाखळी चोरीच्या गुन्हयातील फिर्यादी यांची चोरी झालेल्या दागिण्याबाबत भावनिकता जडलेली असते. त्या अनुषंगाने पोलीस आयुक्त विपिनकुमार सिंह, सह पोलीस आयुक्त डॉ. जय जाधव, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- २ पनवेल शिवराज पाटील, पनवेल विभाग सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे यांनी वेळोवेळी मिटींग घेवून सोनसाखळी चोरीच्या गुन्हयावर लक्ष केंदीत करून त्यांचेविरूद्ध कडक कारवाई करण्याकामी सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकारी यांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक जितेंद्र सोनवणे यांनी गुन्हेप्रकटीकरण शाखा यांना सदर गुन्हयाबाबत प्रतिबंधात्मक

…/२

# शाळेची फि न भरल्याने यू.ई.एस शाळेने विद्यार्थ्यांना बसविले वर्गाबाहेर

**दै.रायगड नगरी । उरण**

शाळेची फी भरली नसल्याने शिक्षण घेणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांना अपमानास्पद वागणूक देत तासनतास वर्गाबाहेर ताटकळत ठेवण्याचा निंदनीय प्रकार उरण मध्ये घडला असून या घटनेमुळे पालक वर्गामध्ये तीव्र संतापाचे वातावरण पसरले आहे. उरण शहरात अनेक नामांकीत इंग्रजी माध्यम शाळापैकी बोरी येथील यूईएस ही शाळा असून इंग्रजी माध्यमाच्या या शाळेत गरिब श्रीमंत अशा सर्वच स्तरातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र या शाळेत विद्यार्थ्यांना शाळेची फी भरली नसल्याने वर्गासमोर तासनतास ताटकळत ठेवल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

दि १५/९/२०२२ रोजी नेहमीप्रमाणे विद्यार्थी सकाळी ७ वाजता शाळेत गेले होते. मात्र फी न भरल्याने त्यांना वर्गात न घेता वगाबाहेर वसविण्यात आले. सकाळी ७ ते १०:३० वाजेपर्यंत शाळा प्रशासनाचे शिक्षक अथवा प्राचार्य किंवा शाळा व्यवस्थापणची



एकही जबाबदार व्यक्ती तिथे बघायला सुद्धा आले नाहीत. असा प्रकार घडला असता शाळा व्यवस्थापनाच्या कोणत्याही प्रतिनिधिंनी याबाबत कोणत्याही प्रकारची सहानुभूती दाखविली नाही. घडलेला सर्व प्रकार विद्यार्थ्यांच्या पालकांच्या लक्षात येताच त्यांनी शाळेत धाव घेतली व घडलेल्या निंदनीय व बेकायदेशीर प्रकाराबाबत युईएस प्रशासनाच्या शिक्षक, प्राचार्यांना जाब विचारला असता विदयार्थ्यांना वर्गाबाहेर बसविले नसल्याचे प्राचार्य सिमरन दहिया यांनी सांगितले. पालकाचा संताप बघून व घडलेली घटना लक्षात घेऊन विद्यार्थी वर्गाबाहेर असल्याचे समजताच वर्गा बाहेरील विद्यार्थ्यांना त्वरित आत(वर्गात )घेण्याचे आदेश प्राचार्य यांनी शिक्षकांना दिले. मात्र सदर असा प्रकार घडल्याचे मला माहित नाही असे सांगत प्राचार्याने हात वर केले. विदयार्थ्यांना सकाळी ७ ते १०:३० या वेळेत वर्गाबाहेर ठेवल्याने पालकांच्या डोळ्यात पाणी आले. आणि त्यांनी शाळा प्रशासनाला धारेवर धरले. ५ वी ते १० वर्गात शिकणाऱ्या एकूण १८ विदयार्थ्यांना वर्गाबाहेर बसविण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते जयंत गांगण यांनी यूईएस शाळा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर यांच्या कानावर फोन करून ही बाब टाकली असता लगेच ते शाळेत हजर झाले. मिलिंद पाडगावकर यांनी

…/२

# तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचा साखर चौथ गणेशोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व विद्याशाखेच्या वतीने साखर चौथ गणेशोत्सव अतिशय उत्साहात विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. दिनांक १२ सप्टेंबर,२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरवणूक काढून संकुलात गणपतीचे आगमन झाले.

दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी संस्थेचे सचिव मंगेश देशमुख यांच्या हस्ते श्रीं ची विधीवत पूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर म्हसळा चे रुपेश गमरे यांनी विज्ञानाचे वेगवेगळे प्रयोग करून चमत्कारांमागील विज्ञान हा कार्यक्रम सादर करून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टीने जीवन जगावे असा सल्ला दिला. पेणचे डॉ. विजय पवार यांनी लोककला जागर कार्यक्रमात भवानी आई रोडगा वाहील तुला या भारुडचे वास्तव सादरीकरण केले.

रोहीत भागवत, सुहास भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली मयुरी साळवी व सहकारी विद्यार्थ्यांनी भजन सादर करून भक्तीमय वातावरण तयार केले. सायंकाळी ५.०० ते ७.०० या दरम्यान सर्व विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांनी नृत्य व एकांकिका सादर केले. सायंकाळी ७.०० वाजता तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. रात्री ८.०० वाजता शाहीर सचिन कांबळे यांनी तानाजी मालुसरे यांच्या जीवनावरील पोवाडा सादर केला. रात्री ८.३० वाजता संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे यांच्या हस्ते श्री ची आरती करण्यात आली यावेळी माजी राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी संस्थेला भेट देऊन



गणेशाचे दर्शन घेतले.

रात्री ११.०० नंतर संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी जागरण करून संगीत व भजन सादर केले. साखर चौथ गणेशोत्सवानिमित्त तळा परिसरातील ग्रामस्थ, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नगरपंचायतीचे नगराध्यक्षा व नगरसेवक, तहसीलदार अण्णप्पा कनशेट्टी, पोलीस ठाणेचे पो-लीस निरीक्षक गोविंद ओमासे, कृषी, आरोग्य, विद्युत महामंडळ सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे कर्मचारी यांनी श्री चे दर्शन घेतले. वरीष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ भगवान लोखंडे यांच्या उत्कृष्ट कार्यामुळे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला. फलक लेखन प्रा. एन सी पाटील व विनोद कोलवणकर यांनी केले.

दिनांक १४ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता कार्यकारी मंडळाचे सदस्य महेंद्र कजबजे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर प्रगती रिसबूड, शिंदे बुवा व सहकाऱ्यांनी भजन सादर केले. दुपारी कर्नाळा ग्रामस्थांनी बहारदार असे लोकनृत्य सादर केले. दुपारी ३.३० ते ६.०० या वेळेत डी जे च्या तालावर नाचत वाजत गाजत विसर्जन मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकीत तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे,उपाध्यक्ष पुरूषोत्तम मुळे, सचिव मंगेश देशमुख, विश्वस्त मार-ोती शिर्के, कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. श्रीनिवास वेदक, महेंद्र कजबजे, श्रीराम कजबजे, महादेव बैकर, ड कौस्तुभ धामणकर, चंद्रकांत खातू संस्थेचे पदाधिकारी, प्राथमिक विद्यालय, माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय व वरीष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या संपूर्ण गणे-शोत्सचे निवेदन सुहास वावेकर यांनी सुंदर पद्धतीने केले.

# कळंबोली शिवसेना शाखा ते कामोठे सिग्नल दरम्यान रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्याची स्त्री शक्ति फाऊंडेशनची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कळंबोली शिवसेना शाखा ते कामोठे सिग्नल दरम्यान रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्याची मागणी स्त्री शक्ति फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा विजया चंद्रकांत कदम यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



कळंबोली येथे पनवेल सायन महामार्गालगत मार्बल मार्केट ते कळंबोली वाहतूक शाखा यादरम्यान सर्विस रोड आहे. काही वर्षापूर्वी सिडकोने या रस्त्याचे डांबरीकरण केले. मात्र हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याने काही महिन्यातच ह्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. विशेष करून शिवसेना शाखा ते कामोठे सिग्नल यादरम्यानचा रस्ता पूर्णपणे खड्ड्यात गेला असून चारचाकी व दुचाकी वाहने चालवता येत नाही इतकी बिकट आणि विदारक अवस्था आहे. पावसात खड्ड्यात पाणी साचल्याने वाहन चालकांना काहीच दिसत नाही. या कारणाने लहान-मोठे अपघात घडतात. या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे कळबोलीकर त्रस्त आहेत. त्यामुळे महानगरपालिकेने किमान शिव-सेना शाखा ते कामोठे सिग्नल या दरम्यानच्या रोडचे कॉंक्रिटीकरण करावे अशी मागणी स्त्री शक्ति फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा विजया चंद्रकांत कदम यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात त्यांनी रस्त्याच्या एका बाजूला पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी आरसीसी गटारे बांधावे तर दुसऱ्या बाजूला पाईपलाईन त्याचबरोबर महावितरणच्या वीज वाहन्या भूमिगत करण्याची मागणी केली आहे.

# म्हसळा शहरांत युवासेनेने केला सरकारचा निषेध

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

वेदान्त आणि फॉक्सकॉन यांचा संयुक्तरित्या महाराष्ट्रात तळेगाव येथे येऊ घातलेला प्रकल्प गुजरातमध्ये गेल्याच्या विरोधात सरकारचा निषेध म्हणून म्हसळा दिघी नाका येथे युव-ासेनेचे अध्यक्ष अमित महामुनकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी तालुका प्रमुख सुरेश कुडेकर, क्षेत्र संघटक रवी लाड, माजी तालुका प्रमुख नंदू शिर्के, शहरप्रमुख अनिकेत पानसरे, महिला आघाडी प्रमुख रीमा महामुनकर, श्याम कांबळे, दिपल शिर्के, निशा पाटील, शौकत हजवाने, हेमंत नाक्ती, प्रसन्ना निजामपूरकर, कौस्तुभ करडे, संतोष सुर्वे, राहुल जैन, बाळा म्हात्रे हे मूळ शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

वेदांता आणि फॉक्सकॉन यांचा संयुक्तरित्या महाराष्ट्रात येऊ घातलेला प्रकल्प गुजरात मध्ये गेला, यामुळे एक लाख तरुणांचा रोजगार गेला याबाबत शिंदे-फडणवीस सरकारच्या निषेधार्थ माजी तालुका प्रमुख नंदू शिर्के यानी शासनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. उपस्थित युवासेनेतर्फे आज गुरु दि.१५सप्टेंबर रोजी तालुक्यातील दिघी नाका येथील मुख्य चौकांत निषेध आणि सह्यांची मोहीम घेण्यात आली. यावेळी पन्नास खोके एकदम ओके सरकारचा निषेध असो.उद्धव साहेब आगे बडो हम तुम्हारे साथ है...आदित्य साहेब आगे बडो हम तुम्हारे साथ है अशा प्रकारे घोषणाबाजी करून परिसर दुमदुमून टाकला. 'शिंदे-फडणवीस या खोके सरकारच्या हलगर्जीपणामुळे वेदांता-फॉक्सकॉन प्रोजेक्ट गुजरातमध्ये गेला आहे. त्यामुळे आता राज्यातील एक लाख तरुणांचा रोजगार हिरावला गेला असेही युवा सेनेचे अध्यक्ष महामुनकर यानी पत्रकारांजवळ सांगितले.



# बंदिस्त वॉल कंपाऊंडच्या मागील बाजुस जमिनीलगत छिद्र पाडून ८.४४ लाखांच्या केबलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात चोरट्यांनी पनवेल तालुक्यातील वलप गांव येथील बंदिस्त वॉल कंपाऊंडच्या जमिनीलगत छिद्र पाडून आतमधील सुमारे ८ लाख ४४ हजार रुपये किंमतीची ४४३० मीटर लांबीची तांब्याच्या धातुची केबल चोरुन नेल्याची घटना घडली आहे. पनवेल तालुका पोलिसांनी या प्रकरणी केबल चोरट्या विरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

तळोजा एमआयडीसीमध्ये परफॉर्मेन्स केमिसर्व्हे प्रा. लि. कंपनीचे अमोनिया प्लॅन्ट उभारण्याचे काम सुरु आहे. सदर प्लॅन्ट उभारणीचे काम टोयो इंजिनियरींग प्रा. लि. केमिसर्व्हे प्रा. लि. कंपनीच्या वतीने करण्यात येत आहे. परफॉर्मेन्स कंपनीने या प्लॅन्ट उभारणीसाठी लागणारी विविध उपकरणे वलप गावालगतच्या बंदीस्त वॉल कंम्पाऊंड मध्ये सुरक्षितरित्या ठेवल्या होत्या. मात्र, ८ सप्टेंबर रोजी पहाटे अज्ञात चोरट्यांनी १२ फुट उंचीच्या या वॉल कंपाऊंडला जमिनीलगत एक माणूस आरपार जाईल अशा पध्दतीने छिद्र पाडून आतमध्ये प्रवेश केला. त्यांनतर सदर चोरट्यांनी आतमधील एकूण ४४३० मीटर लांबीची सुमारे ८ लाख ४४ हजार रुपये किंमतीची तांब्याच्या धातुची केबल चोरुन नेली.

सकाळी सदर यार्ड मधील कर्मचाऱ्याने केबलची तपासणी केली असता, त्याचा स्टॉक कमी असल्याचे आढळून आले. त्यामुळे यार्ड मधील कर्मचाऱ्यांनी संपुर्ण यार्डमध्ये शोध घेतला असता, सदर वॉल कंम्पाऊंडच्या मागील बाजुस जमिनीलगत छिद्र पडल्याचे निर्दशनास आले. त्यानंतर चोरट्यांनी छिद्र पाडुन केबल चोरुन केल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## डोळ्यात तरळणारे आनंदाश्रू हेच आमच्या परिश्रमाचे फलित : बिपिन कुमार सिंह

कार्यरत असणारे पोलीस आहेत म्हणून आपण निश्चिंत असतो.माझ्या लेखी पोलिस हे खरे हिरो आहेत. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील यांनी प्रास्ताविक सादर केले. कॉलिटी मॅनेजमेंट सिस्टीम च्या विविध निकषांच्या माध्यमातून ६ पोलीस स्थानक कार्यालयांना आयएसओ ,९००१:२०१५ मानांकन बहाल करण्यात आले. पोलीस उपयुक्त परिमंडळ दोन पनवेल कार्यालय, सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल कार्यालय, पनवेल तालुका पोलीस ठाणे, कामोठे पोलीस ठाणे, तळोजा आणि खारघर पोलीस ठाणे यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सदर सोहळ्याला मोहल्ला शांतता कमिटी, महिला दक्षता समिती सदस्यांचे मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह,पोलीस सह आयुक्त डॉ.जय जाधव आणि अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे विभाग महेश घुर्ये, श्री बास दत्ता,पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील,सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनावणे आदी मान्यवरांच्या सह पोलीस स्थानकांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, फिर्यादी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते ओएनजीसी कंपनीच्या वतीने नावाशिवा पोलीस स्टेशन येथे आस्थापनात झालेल्या चोरीची तक्रार नोंदविली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक भटे यांच्या मार्गदर्शनाखाली कुशल गुन्हे अन्वेषणाच्या माध्यमातून गुन्ह्याची उकल करण्यात आली. कंपनीचा मुद्देमाल त्यांच्या अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आला. पोलीस खात्याने दाखवलेल्या तत्परतेमुळे आणि कार्य कुशल्येमुळे कंपनीच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी नवी मुंबई पोलीस परिमंडळ २ विभागास रुपये एक लाख रुपयाचे विशेष पारितोषिक घोषित केले आहे. लवकरच सदर पारितोषकाचा धनादेश आयुक्त बिपिन कुमार सिंह यांच्या ताब्यात देणार असल्याचे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कळविले. अनंत चतुर्दशीच्या दिवशी पनवेल कोळीवाडा येथे शॉक लागून ११ नागरिक जबर जखमी झाले होते. यात एका नऊ महिन्याच्या मुलीचा समावेश देखील होता. यावेळी पनवेल शहर पोलीस स्थानकातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने,पोलीस निरीक्षक संजय जोशी,सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी हुलगे यांनी तातडीने मदत पोहोचवत या जखमींना मृत्यूच्या दाढेतून बाहेर खेचून आणले. त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

## पमपाला 'अमृत २' साठी केंद्राकडून सव्वा चारशे कोटी मंजूर

करून गेले तीन वर्षे रखडलेला अमृत प्रकल्प पुन्हा मंजूर करून घेतला आहे. त्याबद्दल त्यांचे पनवेल महानगरपालिकेतर्फे पुन्हा एकदा मी आभार मानतो, असे माजी सभागृहनेते परेश ठाकूर म्हणाले. पनवेल महापालिकेमार्फत हे सर्व प्रकल्प वेगाने राबविले जावेत आणि त्यात कोणताही अडथळा येऊ नये याची खबरदारी आम्ही यापूर्वीच घेतली आहे. हे प्रकल्प राबवण्यासाठी आवश्यक असलेले सर्व ठराव आम्ही यापूर्वीच मंजूर केले आहेत. तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनासाठी पमपा आणि आम्ही सारे लोकप्रतिनिधी जनतेसाठी काम करीत राहू, याची मी आपल्याला ग्वाही देतो, असेही परेश ठाकूर यावेळी म्हणाले.

## सिडकोमध्ये अभियंता दिन उत्साहात साजरा

दिलेल्या योगदानाचा आढावा घेतला. अभियंता दिन कार्यक्रमानिमित्त टेक्निकल पेपर व अद्वितीय कामगिरी स्पर्धांतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. टेक्निकल पेपर स्पर्धे अंतर्गत प्रथम पारितोषिक श्री. भूषण शिंदे, द्वितीय पारितोषिक श्री. विजय ढाळे, तृतीय पारितोषिक श्री. रसिक गौतम, श्रीमती स्वप्ना कदम व श्री. मनोज सूर्यवंशी यांना विभागून आणि श्री. राजीव कोलप यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्रदान करण्यात आले. अद्वितीय कामगिरी स्पर्धे अंतर्गत अधीक्षक अभियंता (गृहनिर्माण-३) यांच्या प्रधानमंत्री आवास योजना-२०१९ संघाला, अधीक्षक अभियंता (गृहनिर्माण-२) यांच्या प्रधानमंत्री आवास योजना-२०१८ संघाला, अधीक्षक अभियंता (विद्युत-नवी मुंबई) यांच्या प्रधानमंत्री आवास योजना-२०१८ संघाला आणि अधीक्षक अभियंता विशेष प्रकल्प) यांच्या कोविड समर्पित आरोग्य केंद्र संघाला या प्रसंगी गौरविण्यात आले. अभियंता दिन कार्यक्रमाची सांगता डॉ. विशाल ठोंबरे, कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी 'रस्ते बांधणीचे आधुनिक तंत्रज्ञान' या विषयावर केलेल्या सादरीकरणाने झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती. प्राजक्ता साळुंखे, सहाय्यक अभियंता व श्री. गौरव हिंगणे, सहाय्यक अभियंता यांनी तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. सुरेश ठाकूर, कार्यकारी अभियंता (उलवे-१) सिडको तथा सरचिटणीस, सिडको इंजिनिअर्स असोसिएशन यांनी केले.

## तळोजा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाकडून अटक

उपाययोजना व दाखल गुन्हयांचा कौशल्यपूर्ण तपास करणेबाबत वेळोवेळी सुचना दिल्या होत्या. तळोजा पोलीस ठाणे येथे सन २०२२ मध्ये एकुन ०४ चैन चोरीचे गुन्हे घडले असुन गुन्हेप्रकटीकरण पथकांनी सदर गुन्हयांच्या तपासादरम्यान नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात घडलेल्या सोनसाखळी चोरीचा तपशिल संकलीत केला. त्यानुसार घटनास्थळांवरील संशयीतांचे सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून चोरी करतांना वापरलेल्या वाहनांचे प्रकार, चोरीचे ठिकाण, चोरीची वेळ व वार, वाहनांवर बसलेल्या आरोपीतांचे वर्णन यांचे तपशिलवार वर्गीकरण करून अभ्यासपूर्ण व कौशल्यपूर्ण तांत्रिक तपास करून सोनसाखळी चोरी करणाऱ्या गुन्हेगारांची यादी तयार केली. सदर सराईत गुन्हेगार यांचा कसोशीने माग काढत असतांना तळोजा पोलीस ठाणे गुन्हेप्रकटीकरण पथकातील पोना विजय पाटील यांना मिळालेल्या गोपनिय बातमीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सोनवणे व पोलीस निरिक्षक (गुन्हे) दत्तात्रय किंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षिक नरेंद्र पाटील, पोहवा दिपक पाटील, पोना विजय पाटील, पोना गुरूनाथ मुंडेरे, पोना सुभाष राठोड, पोना हरिदास करडे व पोकों संदेश उतेकर यांनी तळोजा पोलीस ठाणे हद्दीत चैनस्नॅचिंग करण्याच्या तयारीत बाहेर पडलेल्या दोन आरोपीत इसमांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्यपूर्ण तपास केला असता आरोपींनी अलिकडील काळात चैन चोरीचे गुन्हे केले असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली. तपासादरम्यान आरोपीत यांनी तळोजा, खारघर, कळंबोली, पनवेल, खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत चैनचौरीचे एकुण ९ गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. आरोपींतांनी वेळोवेळी सोनसाखळी चोरी करण्याकरता वापरलेल्या ३ मोटार सायकली जप्त केल्या आहेत. तसेच आरोपींनी चोरी केलेले सुमारे ०५,१७,५००/- रूपये किमतीचे दागिने व मोटार सायकली असा एकुण ८.५ लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून नवी मुंबई आयुक्तालयातील परिमंडळ-२ पनवेल मधील खालील सोनसाखळी चोरीचे ०९ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

## शाळेची फि न भरल्याने यू.ई.एस शाळेने विद्यार्थ्यांना बसविले वर्गाबाहेर

घडलेला सर्व प्रकार समजून घेउन पालकांची प्रत्यक्ष समस्या समजून घेउन सदर घटना निंदनीय असून अशी घटना पुन्हा होणार नसल्याची कबूली उपस्थित पालकांना दिली.दरम्यान (पालक शिक्षक संघटनेचे )व्हाईस प्रेसिडेंट प्राजक्ता गांगण यांनी पालकांशी अपशब्द वापरणाऱ्या व या सर्व घटनेला सर्वस्वी जबाबदार असलेले शिक्षक व प्राचार्य यांना निलंबित करण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांनी फी भरली नसल्याकारणाने त्यांना वर्गाबाहेर अपमानास्पद वागणूक देत बसविण्यात आले. हा निर्णय कोणाचा होता असे पालकांनी शिक्षकांना विचारले असता शिक्षकांनी आम्हाला वरून आदेश असल्याचे सांगितले. शाळा प्रशासनाला विचारले असता आम्ही विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर बसविण्याचे कोणतेही आदेश दिले नसल्याचे सांगितले. एकंदरीत शिक्षक व प्राचार्य यांच्याकडून कोणतेही समाधानकारक उत्तरे पालकांना मिळाले नाही. उलट उडवा उडवीची उत्तरे पालकांना मिळाली.विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर कोणी बसविले हे कोणीच सांगायला तयार नसल्याने घडलेला प्रकार निंदनीय असून उपस्थित सर्व पालकांनी या घटनेचा तीव्र निषेध केला. फी संदर्भात अशा घटना यू.ई.एस शाळेत वारंवार होत असून अशा घटना पुन्हा होउन नयेत यासाठी गट शिक्षणाधिकारी,शिक्षणमंत्री यांनी या संबंधित शिक्षक व प्राचार्यावर कारवाई करावी अशी मागणी पालकांनी केली.


**PANVEL MUNICIPAL CORPORATION**
**TENDER NOTICE**

**CITY ENGINEER'S OFFICE (PMAY DEPARTMENT)**

**INVITATION OF TENDER FOR THE WORKS OF "CONSTRUCTION OF HOUSING COMPLEX UNDER PRADHANMANTRI AAWAS YOJANA" (PMAY)**

Offers by way of e-tendering (Lump Sum Turn-key Form) are invited by the Commissioner, Panvel Municipal Corporation from experienced contractors in e-tendering system for following works. Contractor shall quote his offer considering all taxes excluding GST.

| Name of work | Estimated cost put to the tender (Rs) | Amount of E.M.D (Rs) | Time limit in Calendar months | Cost of Tender Document |
|---|---|---|---|---|
| 1) Survey, Planning, Designing, Building Construction, Obtaining All Relevant Permissions, Required Completion/ Occupancy Certificate from Concerned Local Authority On Lump-Sum Turnkey Basis for Construction of Affordable Housing Under Pradhan Mantri Awas Yojana (Urban) For Rehab and Free Sale Dwelling Units EWS 649& LIG - 165 with Commercial Component of 89 Shops in Panvel Municipal Corporation (PMC) Area. C.A.No. PMC/CE/ PMAYI 90 / 2022 | 136.09 Crores | 68.05 Lakhs | 36 Months (Including Monsoon) | Rs. 5,000/- + 18% GST Total Rs. 5900/- (Non Refundable) |
| 2) Survey, planning, designing, building construction, obtaining all relevant permissions, required completion/ occupancy certificate from concerned authority on EPC (Lump-sum) for Construction of affordable housing under Pradhan Mantri Awas Yojana (Urban) for Rehab and Free sale dwelling units EWS 1602& commercial component of 87 shops at Patel mohalla & kachhi mohallal within Panvel Municipal Corporation area. C.A.No.PMC/CE/ PMAY/ 91 / 2022 | 266.62 Crores | 133.31 Lakhs | 36 Months (Including Monsoon) | Rs. 5,000/- + 18% GST Total Rs. 5900/- (Non Refundable) |

The details of above works, such as Earnest Money Deposit, Security Deposit, Terms & Conditions of the Tender and Schedule of works, are available on website www.mahatenders.gov.in Tenders for these works are to be submitted by e-tendering system.

Bidders can avail the e-tender document **from 19/09/2022** to **02/11/2022** up to 5.00 PM.

Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last dateof Submission by way of e-tendering will be **02/11/2022 up to 5.00 PM.** Commissioner, Panvel Municipal Corporation reserves the right to accept or reject any or all tender without giving any reason thereof.

दिनांक : १४/०९/२०२२

**Sd /-**
**(Kalpita Pimple)**
Dy. Commissioner Panvel Municipal Corporation,
Panvel – 410 206


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सर्पमित्र तथा प्राणीमित्र कुमार देशपांडे यांचा गावठाण येथे विशेष सन्मान

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे शहरातील सर्पमित्र तथा प्राणीमित्र कुमार देशपांडे यांचा तालुक्यातील गावठाण येथे यथोचित सन्मान करण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

साखरचौथ गणेशोत्सव सोहळ्याचे औचित्य साधून गावठाण येथील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिवमुद्रा मित्र मंडळाचे वतीने मंडळाचे अध्यक्ष स्वप्निल कांदळेकर, उपाध्यक्ष निलेश कदम, सल्लागार दत्ता सानप यांच्या हस्ते सर्पमित्र तथा प्राणीमित्र कुमार देशपांडे यांचा शाल,श्रीफळ, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन मोठ्या उत्साहात सन्मान करण्यात आला. तसेच गावठाण येथील अंगणवाडी सेविका विश्रांती कदम यांच्या कोरोना काळातील कामगिरीची दखल घेऊन व धाडसी छोटा गोविंदा विघ्नेश कदम याच्या धाडसाबद्दल त्यालाही सन्मानित करण्यात आले. यावेळी पो.पाटील बाळू सानप, गाव कमिटी अध्यक्ष सुभाष भोकटे, पुजारी विठोबा भोकटे, सरपंच पूजा जंगम, महेश तुपकर, मारूती सानप, सुरेश शेडगे व कुमार देशपांडे यांच्या समवेत अनिकेत पाडसे, स्वप्निल काफरे, अक्षय देशमुख, बसवराज दिसले, दिनेश शिर्के आदी मान्यवर उपस्थित होते.


**सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**दैनिक रायगड नगरी**
**9619979706 / 9619737911**



### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


### जाहीर नोटीस

या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.महालक्ष्मी डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा.श्री.धर्मा नारायण म्हात्रे पत्ता : भूखंड नं.०९, से.०५, कोपरखरणे, नवी मुंबई हे खालील वर्णनाचा भूखंड ''वरद विनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित'' (नियोजित) पत्ता : भूखंड नं.०९, से.०५, कोपरखैरणे, नवी मुंबई, या सोसायटीच्या नावे भूखंड हस्तांतरण करून देत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| कोपरखैरणे | ०९ | ०५ | ५९९.८५ चौ.मी. |

तरी कोणाही व्यक्तीचे / व्यक्ती किंवा आर्थिक संस्थेचे भूखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरती, जसे बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षिस, भाडेपट्टा, वारसा, हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत कागदपत्रांसोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे. मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही किंवा हस्तांतरण झाल्यनंतर ही आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.१२/०९/२०२२

**सही/-**
**ॲड.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभात सेंटर,**
**सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई**

### PUBLIC NOTICE

THIS NOTICE is hereby given on behalf of my client M/S. PRATHAMESH INFRA REALITY PVT.LTD through Director Mr. AJIT SHRINATH SINGH, who have filed Special Civil Suit No. 193/2014, in Panvel Court against Original Owners/Farmers in respect of property mentioned herein below in the schedule for Specific Performance of Contract and Injunction. Also my client have purchased complete rights, title, benefits, interests in the said below mentioned property from said Original Owners/Farmers, Late Maruti Valku Jitekar through Legal Heirs 1) Smt Anusaya Maruti Jitekar, 2). Shri Balkrushna Maruti Jitekar,3). Shri Kashinath Maruti Jitekar, 4). Smt.Aruna Sanjay Jitekar, 5) Smt. Anandibai Maruti Jitekar, 6). Smt. Vaishali Dynaneshwar Bhagat, 7). M/S. Sunny Housing India Pvt.Ltd Through Director Shri. M.C.Sunny Hence on behalf of my client, I am giving this Notice to Public at large that not to deal with the above mentioned persons in respect of the aforesaid property. And inspite of this person deal with them or their agents regarding below mentioned properties and faces any loss, then my client will not be responsible for that, they may do so at their own risks, costs and consequences which please note.

**SCHEDULE : DETAILS OF CIVIL SUIT**
**IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D) PANVEL**
Special Civil Suit No. 193/2014
Name of Defendant :- Anusaya Maruti Jitekar and others
Discription of Property.
Admeasuring about 2299.31 Sq.Mtrs
Cidco File No. 87-DPL, Ulwe

Sd/-
**Advocate Deepak Khot**
BSL,LLB. HighCourt, Mumbai.
Add: Off No 32, Plot No 21, Sec-11,
CBD BELAPUR, NAVIMUMBAI
Mob No : 9270355370

# ॲमेझॉन व फ्लिपकार्ट कंपनीस गंडा घालणाऱ्या उच्चशिक्षीत इंजिनिअर व त्याचे साथीदारांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मानपाडा पोलीस ठाणेकडुन बनावट आधारकार्डव्दारे अमेझॉन व फ्लीपकार्ट कंपनीस गंडा घालून त्यांची फसवणुक करणाऱ्या उच्च शिक्षीत इंजिनिअर व त्याचे साथीदारांचे टोळीचा पर्दाफाश करण्यात आला आहे. आरोपी यांनी गुगलवरुन ओळख नसलेल्या लोकांचे आधारकार्ड डाऊनलोड करुन, त्या आधारकार्डवरील मुळ इसमाचा फोटो एडीटर अँपवरुन क्रॉप करुन त्या ठिकाणी आरोपी हे त्यांचा फोटो लावुन, सिमकार्ड विक्रेता आरोपी याचेकडुन सदर आधारकार्डचे आधारे सिमकार्ड खरेदी करायचे, सिमकार्डचे मोबाईल नंबरवरुन मेझॉन व फ्लीपकार्ट या कंपन्यांकडुन ऑनलाईन मोबाईल, टॅब, आयपॅड, लॅपटॉप अशा वस्तु ऑर्डर करायचे. कंपनीचा डिलेव्हरी बॉय सदर वस्तु देण्यास आल्यावर त्याचेकडुन सदर वस्तुचा बॉक्स ताब्यात घेवुन त्यास पैसे मोजण्यात गुंतवुन ठेवुन, तो पैसे मोजत असताना सदरचा वस्तुचे पॅकींग बॉक्स त्यांचे साथीदार ताब्यात घेवुन त्या बॉक्सला कटरने कापुन त्यातील वस्तु काढुन घेवुन त्या ठिकाणी त्या वजनाचा दगड, कपड़ा पॅक करून पैसे कमी असल्याचे कारणावरुन नंतर पैसे देतो असे कारण सांगुन सदर वस्तुचा बॉक्स डिलेव्हरी बॉयला परत करुन तो कंपनीस परत पाठविणेस सांगुन, डिलेव्हरी बॉयकडुन प्राप्त मोबाईल व इतर वस्तु कमी किमतीत बाजारात विक्री करीत असल्याचे आढळुन आले आहे.



आरोपी यांनी गुजरात, कलकत्ता राज्यातील विविध शहरात तसेच महाराष्ट्र राज्यातील पुणे, मुंबई, सातारा, ठाणे, अलिबाग शहरात सदरचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. तसेच त्यांना यापुर्वी कराड, अलिबाग, कासारवडवली या पोलीस ठाणेत अशा प्रकारचे गुन्हे केल्याबद्दल अटक करण्यात आली असल्याची माहिती तपासात प्राप्त झाली आहे. तरी आरोपीत हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेवर इतरही ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत! काय याचा तपास करीत आहोत. नमुद गुन्हयाचा तपास वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली चालु करण्यात आला. तपासात केलेल्या अथक प्रयत्नात आरोपीत नामे रॉबीन ॲन्टनी आरुजा (वय २८ वर्षे, रा. फ्लॅट नं. ७०५, रिव्हर व्ह. एफ विंग, कासारियो, पलावा, डोंबिवली पूर्व), किरण अमृत बनसोडे (वय २६ वर्षे, रा. १०३, स्वप्नसुंदर रेसिडेंन्सी, गणेश चौक, काकाच्या ढाब्या जवळ, कल्याण पुर्व), रॉकी दिनेशकुमार कर्ण (वय २२ वर्षे, रा. रुम नं. बी / १०५, उपासना अपार्टमेंट, राजाराम पाटील नगर, आडवली-ढोकळी, पिसवली, कल्याण पुर्व), नवीनसिंग राजकुमार सिंग (वय २२ वर्षे, रा. फ्लॅट नं. १०९, सद्गुरु प्लाझा, काकाचा ढाबा जवळ, मलंग रोड, पिसवली, कल्याण पुर्व) तसेच अलोक गुल्लु यादव (वय २० वर्षे, रा. रुम नं. १० जय माता दी चाळ, नॅशनल स्कुल जवळ, दिवा शिळ रोड, डोंबिवली पूर्व ( सिमकार्ड विक्रेता) यांना अटक करण्यात आलेली आहे.

आरोपींकडे केलेल्या चौकशीत त्यांनी मेझॉन व फ्लिपकार्ट या कंपन्यांकडुन बनावट आधारकार्डचे आधारे सिमकार्ड प्राप्त करुन त्यांचेकडुन मोबाईल व इतर वस्तु ऑर्डर करुन त्या वस्तुंचे बॉक्स प्राप्त झाल्यानंतर ते कटरचे सहाय्याने कापुन त्यातील वस्तु काढुन त्या ऐवजी दगड व कापड टाकुन, सदर वस्तु पैसे कमी असल्याचा बहाणा करुन परत कंपनीस पाठवुन देवुन, स्वतःकडे ठवेलेल्या वस्तु बाजारात कमी किमतीत विक्री करीत असल्याची कबुली दिलेली आहे. सदर गुन्हयात एकंदर ५,८५,१३६ / - रु किमतीचे २२ मोबाईल फोन, ०१ लॅपटॉप, ०१ आयपॅड, ०१ टॅब तसेच २० सिमकार्ड, २९ बनावट आधारकार्ड असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. यातील आरोपीत रॉबीन ॲन्टनी आरुजा हा एमटेक इंजिनिअर आहे. तसेच आरोपी रॉकी दिनेशकुमार कर्ण हा कॉलसेंटरमध्ये नोकरी करीत आहे. आरोपी अलोक गुल्लु यादव हा सिमकार्ड विक्रेता असून, त्याचेकडुन आरोपीत हे जास्त पैसे देवुन ग्राहकाची कोणतीही खात्री न करता सिमकार्ड खरेदी करून, त्याआधारे ऑनलाईन वस्तु ऑर्डर करुन, प्रापत वस्तु बाजारात स्वस्त दरात विक्री करुन मिळालेल्या पैशातुन मौजेमजा करीत असायचे.

सदरची कामगिरी कल्याण पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, कल्याण परीमंडळ ३ पोलीस उप आयुक्त सचिन गुंजाळ, डोंबिवली विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुनिल कुराडे यांचे मार्गदर्शनाखाली मानपाडा पोलीस स्टेशनचे वपोनि शेखर बागडे, सपोनिरी. सुनिल तारमळे, पोहवा प्रशांत वानखेडे, पोहवा अशोक कोकोडे, पोहवा सुशांत तांबे, पोशि संतोष वायकर, पोशि तारांचंद सोनवने यांचे पथकाने केलेली आहे.

## उरण तालुक्यात कुष्ठरोग व क्षयरोग शोध मोहिम

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागा मार्फत कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गत दिनांक १३ सप्टेंबर २२ ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहिम व सक्रिय क्षयरोग शोध मोहिम राबविण्यात येणार आहे. उरण तालुक्यातील ग्रामिण व शहरी भागातील एकूण लोकसंख्या १०३३२० चे सर्वेक्षण करण्यात येणार असून त्याकरीता ८१ आरोग्य पथके व १६ पर्यवेक्षक नेमणूक करण्यात आलेली आहे. २२९६० घरांचे सर्वेक्षण होणर आहे.उरण तालुक्यातील आदीवासी भाग, डोंगराळ भाग व शहरी भागातील झोपडपटटी कोळीवाडा इत्यादी भागातील कुष्ठरोग शोध मोहिम व सक्रिय क्षयरोग शोध मोहिमेचे प्रभावी जनजागृती करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.त्यामुळे सहाय्यक संचालक डॉ. आर. एच. बाविस्कर, प्रभारी गटविकास अधिकारी उरण संजय भोये, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र ईटकरे व ग्रामिण रुग्णालयाचे वैदयकिय अधिक्षक डॉ. बाबासो कालेल यांनी तालुक्यातील जनतेला तपासणी करण्याकरीता जाहीर आवाहन केले आहे.

# रोहे ग्रामीण भागात साखरचौथ गणेशोत्सव सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे ग्रामीण भागात साखरचौथ गणेशोत्सव सोहळा भक्तीमय वातावरणात संपत करण्यात आला.

दहा दिवसांचा गणेशोत्सवाचा सोहळा संपन्न झाल्यानंतर साखर चतुर्थीच्या दिवशी स्थापना करण्यात आलेल्या साखरचौथ गणेशोत्सवाचा सोहळा सतत कोसळणाऱ्या मुसळधार पावसाची तमा न बाळगता भक्तीमय वातावरणात संपन्न करून रोहे तालुक्यातील ग्रामीण भागात गणरायाचे मोठ्या श्रद्धा पूर्वक विसर्जन करण्यात आले. साखरचौथ गणेशोत्सवातंर्गत साखर चतुर्थीच्या दिवशी सकाळी गणेशाचे वाजत गाजत आगमनानंतर मोठ्या भक्तीमय वातावरणात विधिवत पूजा करून विविध धार्मिक तथा अध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावर्षीही तालुक्यातील विविध गावात अनेक वर्षापासून घरगुती व सार्वजनिक स्वरूपात हा उत्सव साजरा करण्यात येत आला.त्या अनुषंगाने साखरचौथ व दुस-या दिवशी गावागावात व घरोघरी मंगलमय व चैतन्यमय वातावरण निर्माण झाले होते. दीड दिवसांच्या या उत्सव प्रसंगी गणरायांचे आगमन झाल्यानंतर महाआरती, हरिपाठ, जागर भजन, महाप्रसाद आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले होते. तर विसर्जन प्रसंगी मुसळधार पाऊस कोसळत असताना देखील गणेशभक्तांचा मात्र उत्साह ओसंडून वाहत असल्याचे पहावयास मिळाले.अतिशय शांततेत व शासकीय व उत्साही वातावरणात सार्वजनिक तलाव व नदीपात्रात रात्रौ उशिरापर्यंत श्रीगणेशाचे भक्तीने व श्रद्धापूर्वक विसर्जन करण्यात आले.



मुजावर साहेब
प्रोसेस जमा रु.१००/- अर्जदारातर्फे ॲड.विमल भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११२८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१५/१०/२०२२

१) आदेश रघुनाथ पवार
वय : ३१ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.मु.मोहोपे, पो.पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड
२) जयश्री रघुनाथ पवार
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.मु.पो.मोहोपे, पो.पोयंजे
३) उमेश रघुनाथ पवार
वय : वर्षे, व्यवसाय : शेती
रा.मु.मोहोपे, पो.पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.रघुनाथ दामोदर पवार हे दि.११/०५/२०२१ रोजी मु.पनवेल शहर आरोग्य विभाग पनवेल महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड या ठिकाणी मयत झाले असून कै.रघुनाथ दामोदर पवार हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, २२० के.व्ही. ओ.एन.जी.सी. उपकेंद्र मुक्काम भिंगारी, ता.पनवेल, जि.रायगड येथे कायमस्वरुपी तंत्रज्ञ श्रेणी ४ या पदावर नोकरीला कार्यरत होते. त्यांचे मृत्यूपश्चात त्यास सदरील अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत.

सबब सदर मयत कै.रघुनाथ दामोदर पवार यांचे वारस म्हणून सदर अर्जदार यांस अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, २२० के.व्ही. ओ. एन.जी.सी. उपकेंद्र मुक्काम भिंगारी, ता.पनवेल, जि.रायगड सदर अर्जदार यांस सक्षम न्यायालयाचा वारस दाखला (Hairship Certificate) आणण्यास सांगितले आहे. सबब सदर अर्जदारांनी मयत कै.रघुनाथ दामोदर पवार यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केले आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांनी मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याच्या आत मे.कोर्टात सादर कराव्यात दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१५ माहे ९/२०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

अर्जदाराचे अधिवक्ता
जयेश संभाजी म्हसे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.जिल्हा न्यायाधिश पनवेल रायगड यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.७७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२०/१०/२०२२

१) श्रीमती.पुर्वा प्रवीण पाटील
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
अर्जदार क्र.१ स्वतःकरिता व अर्जदार क्र.२ व
अर्जदार क्र.३ ची पालनकर्ती आई म्हणून
२) कुमारी श्रुती प्रवीण पाटील
वय : १७ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कुमारी. दुर्वा प्रवीण पाटील
वय : १२ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.३०८, शिवगंगा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी महाराज मैददान शेजारी,
ब्राह्मण आळी, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार यांस १) कुमारी श्रुती प्रवीण पटील, २) कुमारी दुर्वा प्रवीण पाटील अशा दोन मुली आहेत. आणि अर्जदार १) कुमारी श्रुती प्रवीण पाटील, २) कुमारी दुर्वा प्रवीण पाटील यांचे नावे खालील वर्णनाची अविभक्त सामाईक हिश्श्याची मिळकत आहे.

**मौजे : मालेगाव तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड**
**येथील बिनशेती मिळकत**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र चौ.मीटर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | ७३/५ | ४३४ चौ.मी. | ४३-४० |

आणि सदरील मिळकतीचेवर बांधण्यात आलेली घर मिळकत ज्याचा ग्रुप ग्रामपंचायत दहिवली तर्फे वरेडी घर क्र.१०७१ आहे. ज्याचे क्षेत्रफळ ५५० चौ.फूट कारपेट आहे.

(जिचा उल्लेख येथून पुढे पुनरुक्ती टाळण्याच्या उद्देशाने ''अर्ज मिळकत असा केलेला आहे.)

वर वर्णन केलेली मिळकत १) कुमारी श्रुती प्रवीण पाटील, २) कुमारी दुर्वा प्रवीण पाटील यांचे पालनपोषणाकरिता त्यांच्या पुढील महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षणाकरिता आणि अर्जदार यांच्या आर्थिक अडचणीपोटी विक्री करणेची आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांनी १) कुमारी श्रुती प्रवीण पाटील, २) कुमारी दुर्वा प्रवीण पाटील यांच्या अर्ज मिळकतीमधील असलेल्या अविभक्त हिश्याची नैसर्गिक पालक म्हणून विक्री करणेकरिता परवानगी मिळणेसाठी या मा.न्यायालयामध्ये अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये केलेल्या मागणीप्रमाणे अर्जदार यांच्या हक्कास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास तसे त्यांनी लेखी पुराव्यासह या मा.न्यायालयात सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न घेतल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांस १) कुमारी श्रुती प्रवीण पाटील, २) कुमारी दुर्वा प्रवीण पाटील यांची नैसर्गिक पालक म्हणून अर्ज मिळकतीमधील १) कुमारी श्रुती प्रवीण पाटील, २) कुमारी दुर्वा प्रवीण पाटील यांचा अविभक्त हिस्सा विक्री करणेची परवानगी देईल. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**सही/-** **क.लिपीक** **जिल्हा न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **जिल्हा न्याया, पनवेल**

मा.मुजावर सो
अर्जदाराचे वकील : ॲड.एम.जी.गोवारी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४१८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/१०/२०२२

१) श्रीमती.यमुना नामदेव भगत व इतर
वय : ७५ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.रुम नं.३०२, प्लॉट नं.१७, सेक्टर नं.२,
बिल्डींग उलवे, नोड, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात ज्यापेक्षा अर्जदार क्र.१ यांचे पती व २, ३ व ४ यांचे वडील तसेच अर्जदार क्र.४/१ यांचे सासरे व ४/२ ते ४/३ यांचे आजोबा कै.नामदेव बाळाराम भगत हे दि.२७/०२/२०२१ रोजी फ्लॅट नं.५०३, साई संगम प्लॉट नं.१७, सेक्टर नं.०२, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ ते ४/३ ह्यांनी ह्या कोर्टास सदरहू मयत कै.नामदेव बाळाराम भगत यांच्या नावे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकत क्र. ''अ''**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तरघर, ता.पनवेल, जि.रायगड**

मौजे : तरघर, ता.पनवेल, जि.रायगड
घर नं./५२ क,
क्षेत्र : ४८४, चौ.फूट, कौलारु भिंतींचे दुमजली घरत

**मिळकत क्र. ''ब''**
**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| उलवे | ५८+१७० | १५ | ३ | ०.३८.१ | ९.३० |
| उलवे | १२० | ५८ | १ | १.५७.० | २६.३२ |
| तरघर | १०४ ए, बी | ४ | २ | ०.०.६ पो.ख.०.०.५ | ०.७३ |
| | १०४ ए, बी | ५८ | २+३ | १.०५.५ पो.ख.०.०२.५ | १७.४७ |
| | १०४ ए, बी | ४ | ३ | ०.३४.० | १.०० |
| | १०४ ए, बी | ४ | ४ | ०.१२.२ | ०.२७ |

**मिळकत क्र. ''क''**
**मिळकतीचे वर्णन**
**ता.पनवेल, जि.रायगड**

तरघर येथील सर्व्हे नं.४/२, ४/३, ४/४, ५८/२+३ च्या संदर्भात अलिबाग येथील एल.ए.आर.क्र. १७/९७ च्या निकाल दि.१९/१२/०३ प्रमाणे कै.नामदेव बाळाराम भगत यांची वाढीव रक्कमेचा अर्ज मंजूर केलेला असून सदर मुंबई ४६८/०४ येथे पहिले अपिल दाखल केलेले आहे. सदरचे अपिल हे प्रलंबित आहे. वारस नोंद होणे गरजेचे आहे.

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन आहे.

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

येणेप्रमाणे वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै.नामदेव बाळाराम भगत यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१२/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## महाराष्ट्राच्या महिला कबड्डी संघाच्या प्रशिक्षकपदी संजय मोकल यांची निवड

**दै.रायगड नगरी । पेण**

गुजरात, अहमदाबाद येथे होणाऱ्या ३६ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या महिला कबड्डी संघाच्या प्रशिक्षकपदी रायगडचे माजी राष्ट्रीय खेळाडू संजय मोकल यांची निवड करण्यात आली आहे.



२६ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान ३६ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन गुजरात, अहमदाबाद येथे करण्यात आलेले आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र महिला संघ सहभागी होणार असून या संघाच्या प्रशिक्षक पदाची जबाबदारी संजय मोकल यांना देण्यात आली आहे

संजय मोकल हे पेण तालुक्यातील करावी गावातील नवतरुण क्रीडा मंडळाचे खेळाडू आहेत. मोकल यांनी रायगड जिल्हा कबड्डी संघाचे कर्णधारपद भूषविले आहे. त्यांनी रायगड जिल्हा पुरुष व महिला संघाचे प्रशिक्षक म्हणून देखील जबाबदारी सांभाळली आहे. याआधी मोकल यांनी महाराष्ट्र राज्य संघाचे राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत प्रशिक्षक म्हणून उत्तम कामगिरी केली आहे. तर महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या निवड समितीचे सदस्य काम पाहीले आहे. संजय मोकल यांची यांची महाराष्ट्र राज्य महिला कबड्डी संघाचे संघाच्या प्रशिक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. पुणे बालेवाडी येथे सराव शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबीरादरम्यान खेळांडुकडुन कसुन सराव करुन घेतला जाईल अहमदाबाद येथे होणाऱ्या ३६ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे महिला कबड्डीचे विजेतेपद महाराष्ट्राकडे आणण्याचा पूर्ण विचार केला असल्याचे संजय मोकल यांनी सांगितले.

## पनवेल तालुक्यात कुष्ठरोग व क्षयरोग अभियान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यात १३ ते ३० सप्टेंबर या दरम्यान कुष्ठरोग व क्षयरोग अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती सहाय्यक संचालक डॉ. आर. एच. बाविस्कर यांनी दिली. मागील दोन वर्षांमध्ये पनवेल तालुक्यातील २१६ कुष्ठरोगी बरे झाले आहे आहेत. तर चालूवर्षी पनवेलमधील १२१ कुष्ठरुग्ण उपचार घेत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत १३ ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सक्रिय क्षयरोग शोध मोहीम राबविण्यात येणार आहे.

# जेएसडब्लू कंपनीच्या पंप हाऊससाठी भूमिगत उच्च दाबाच्या वीजवाहिनीच्या कामात त्रुटी

## भविष्यात नागरिकांच्या जीवाशी होणार खेळ : खोदकामात रस्त्याच्या दुर्दशेमुळे अपघाताचाही धोका

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

डोलवी (ता.पेण) येथील जेएसडब्लू कंपनीच्या येथील के.टी. बंधाऱ्याजवळील पंप हाऊससाठी भूमिगत उच्च दाबाच्या वीजवाहिनीचे काम सुरु आहे. वीजवितरण कंपनीच्या कानसई येथील उपकेंद्रातून ते पाटणसई ग्रा.पं. हद्दीतील चिकणी गावालगतच्या के.टी. बंधाऱ्यापर्यंत ही वीजवाहिनी जेएसडब्लू कंपनीने नेमलेल्या ठेकेदाराकडून टाकण्यात येत आहे. मात्र या कामात अनेक त्रुटी राहत असल्याने भविष्यात नागरिकांच्या जीवाशी तर खेळ होणार आहे. सध्या तर ही वीजवाहिनी टाकण्यासाठी महामार्गालगत खोदलेल्या खड्ड्यांमुळे सर्व माती रस्त्यावर येऊन अपघातांचा धोका निर्माण झाल्याने नागरिक व वाहनचालकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

जेएसडब्लू कंपनीच्या पंप हाऊससाठी उच्च अश्वशक्तीच्या मोटार बसविण्याच्या असल्याने त्यासाठी पंप हाऊस मध्ये २२ के.व्ही. एवढी



उच्च दाबाची ही वीजवाहिनी टाकण्यात येत आहे. महावितरणच्या १.३ डीडीएफ या योजने अतर्गत हे काम होत आहे. अर्थात हे काम करतांना ग्राहक कंपनीने महावितरणची सर्व कायदेशीर आर्थिक प्रक्रिया पूर्ण करून नंतर त्यांची परवानगी मिळाल्यानंतर परवानाधारक इलेक्ट्रिक ठेकेदाराकडून महावितरणच्या सर्व अटी-शर्तीचे पालन करूनच काम पूर्ण करण्याची जबाबदारी ग्राहक कंपनीची असते. अशाप्रकारे जेएसडब्लू कंपनीने वीजवितरणच्या परवानगीने आपल्या नियुक्त ठेकेदाराकडून हे काम काही दोन महिन्यांपूर्वी सुरु केले. मात्र केवळ राष्ट्रीय महामार्ग खात्याची परवानगी घेऊन हे खोदकाम महामार्गालगत सुरु आहे. मात्र काही ठिकाणी महामार्गालगतच्या मात्र संपादित न झालेल्या जागेतूनही हे काम सुरु असल्याचा आरोप काही शेतकरी करीत आहेत. तर ही वाहिनी उच्च दाबाची असल्याने त्यासाठी सुमारे ३.५ ते ४ फुटापर्यंत खोदकाम करण्याची गरज असतांना काही ठिकाणी तर १-२ फुटांवरच वीजवाहिनीची ही केबल टाकण्यात आली आहे. याशिवाय कहर म्हणजे येथील वाकण पुलावर तर पुलाच्या बाहेरील बाजूने केबल न टाकता पादचाऱ्यांसाठी असलेल्या मार्गीकेवरच ही केबल टाकण्यात आली आहे. अशाप्रकारे अनेक त्रुटी या केबलच्या कामात असल्याने भविष्यात ही वीजवाहिनी प्रवाहित झाल्यास नागरिकांच्या जीवाशी खेळ होणार असल्याने जेएसडब्लू विरोधात सर्वत्र संतापाचे वातावरण निर्माण होत आहे.

यासंदर्भात वीजवितरण विभागाशी संपर्क साधला असता हे काम योग्यरित्या पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी ही ग्राहक असलेल्या जेएसडब्लू कंपनीची असल्याचे सांगण्यात येत आहे. तर या प्रकल्पासंदर्भात कंपनीच्या माहितगार अधिकाऱ्याला आपल्याला माहिती देण्यास सांगण्यात येईल असे जेएसडब्लूचे वरिष्ठ अधिकारी बळवंत जोग यांच्याशी बुधवार दि. १४ सप्टेंबरला संपर्क साधला असता त्यांनी सांगितले. मात्र याविषयीची अधिकृत माहिती प्रस्तुत प्रतिनिधीला अद्याप कुणीही दिली नसल्याने जेएसडब्लू प्रशासनाचे हे वेळकाढू धोरण असल्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# पेण : श्री सदस्यांनी केले १५ टन निर्माल्य गोळा ; निर्माल्य पासून होणार खत निर्मिती

**दै.रायगड नगरी । पेण**

डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या वतीने पेण शहरासह पेण तालुक्यातील गणेश विसर्जन ठिकाणाहून १५ टन निर्माल्य गोळा करण्यात आले असून या निर्माल्य पासून खत निर्मिती केली जाणार आहे .

रेवदंडा येथील डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे वृक्षारोपण व संगोपन, स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी शिबीर, प्रौढ साक्षरता वर्ग, तलावातील गाळ काढणे, विहीर पुनर्भरण आदी विविध सामाजिक कार्य केले जात आहेत. या बरोबरच गणेश विसर्जन वेळी निर्माल्य तलाव अथवा नदीत सोडण्यात येत असल्यामुळे होत असलेल्या पाणी प्रदूषण टाळण्यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने गणेश विसर्जन वेळी निर्माल्य गोळा करुन त्याच्यापासून खत निर्मिती करण्याचा उपक्रम देखील मागील काही वर्षांपासून हाती घेण्यात आला आहे.



या वर्षी पेण शहरातून दीड दिवसांचे ९१६, पाच दिवसांचे ९९३ तर अनंत चतुर्दशी दिवशी २१७ तसेच १६१ गौरींचे विसर्जन करण्यात आले. पेण तालुक्यातील ग्रामीण भागात दीड दिवसांचे १८५४, पाच दिवसांचे ४१९८, अनंत चतुर्दशी ला ७९१ अशा एकूण ७९८९ गणेशमूर्तींचे तसेच १०१० गौरींचे विसर्जन करण्यात आले.

यावेळी डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडाच्या सदस्यांनी पेण शहरातून ४ टन व ग्रामीण भागांतून ११ असे एकूण १५ टन निर्माल्य गोळा करण्यात आले. या साठी पेण शहरांतील २१५ तर पेण तालुक्यातील वाशी नाका ,वाशी, रावे, वरवणे, वरसई, सापोली, धावटे, आंबिवली, जिते, हनुमान पाडा, दादर, शिर्की, वडखळ, भाल या बैठकांतील गावाच्या अंतर्गत येणारे बैठकांतील १३४७ असे एकूण १५६२ श्री सदस्य सहभागी झाले होते. या गोळा केलेल्या निर्माल्य पासून सेंद्रीय खत तयार करण्यात येणार आहे.

## साई प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । माणगाव**

तालुक्यातील साई प्राथमिक आरोग्य केंद्रात १५ सप्टेंबर रोजी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. उपजिल्हा रुग्णालय माणगांव जिल्हा रायगड मार्फत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य विमा योजने अंतर्गत मोफत तपासणी व निदान करण्यासाठी शिबीर आयोजित केले होते. या शिबिरात स्त्री रोग, अस्थिव्यंग, मूत्रपिंड व मूत्रमार्ग विकार, बालरोग, जठर व आतडे शस्त्रक्रिया यांची तपासणी करण्यात आली. या शिबिरात १२७ स्त्री व पुरुष तसेच लहान बालके यांची तपासणी करण्यात आली. या शिबिरात डॉ. सुनीता कोकणे, डॉ. श्वेता भौड, डॉ. चैत्राली पवार, डॉ. वसुंधरा साकोलीकर यांनी तपासणी व निदान केले. तसेच अंकिता पोवार, कविता वाघमारे, मयुरी कासारे, अनिशा महाडिक, फातिमा कुरेशी, यालवा शेख, ऋतिका शिंदे, व्ही. व्ही. चव्हाण, जे. के. शिंदे सहकारी सुद्धा उपस्थित होते.



# जेष्ठ पत्रकार पुरुषोत्तम मुळे यांची तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील जेष्ठ पत्रकार पुरुषोत्तम मुळे यांची तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध फेर नियुक्ती करण्यात आली आहे.पुरुषोत्तम मुळे हे गेली २५/३० वर्षे सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना त्यांनी अनेक लोकाभिमुख उपक्रम यशस्वीपणे पार पडले आहेत.रायगड भूषण पुरस्काराने ते सन्मानित झाले आहेत.



राष्ट्रीय ओबीसी महासंघ कोकण विभाग कार्याध्यक्ष, संस्थापक अध्यक्ष नामदेव शिंपी समाज महासंघ, तळा, संचालक जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा, जेष्ट सल्लागार तळे तालूका मराठी पत्रकार संघ, संचालक एस एस निकम इंग्लिश स्कूल तळा. अशा विविध संस्थाची पदे प्राप्त केलेल्या शैक्षणिक व सामाजिक बांधिलकी असणाऱ्या मुळे यांची तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्षपदी पुन्हा नियुक्ती करून जवाबदारी देण्यात आली आहे. दिलेल्या जवाबदारीला योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न केला आणि यापुढे तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून उदयोन्मुख विद्यार्थी विद्यार्थिनी घडवून निसर्गाने नटलेल्या तळा तालुक्याचे नावलौकिक करणार असल्याचे पुरुषोत्तम मुळे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले. पुरुषोत्तम मुळे यांची तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्षपदी पुन्हा फर नियुक्ती झाल्या बद्दल त्यांचे तळा प्रेस क्लब व सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# वेदांता -फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला पळवून नेल्याबद्दल शिवसेना युवासेनेतर्फे केंद्र राज्य सरकारचा जाहीर निषेध

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

महाराष्ट्रातील वेदांत - फॉक्सकॉन कंपनीचा १.४५ लाख कोटींचा महाराष्ट्राचा प्रकल्प गुजरातला पळवून नेल्याबद्दल राज्य व केंद्र सरकारचा जाहीर निषेध म्हणून मुरुड मध्ये आज शिवसेना व युवासेनेतर्फे स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येऊन शिवसेना तालुकाप्रमुख नौशाद दळवी व शहर अधिकारी प्रतिक उमरोटकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत तहसीलदार रोहन शिंदे यांना एक निवेदन सादर करण्यात आले.



वेदांता -फॉक्सकॉन १.४५ लाख कोटींचा महाराष्ट्रातील १ लाख तरुणांना रोजगार देणारा प्रकल्प गुजरातला पळवून नेल्याबद्दल राज्य व केंद्र सरकारचा निषेध स्वाक्षरी मोहीम गुरुवारी (आज) शहरातील भाजी मार्केट परिसरात राबविण्यांत आली.या मोहिमेला उत्तम प्रतिसाद मिळाला.

वेदांता कंपनीचा फॉक्सकॉन प्रकल्प राज्याबाहेर गेल्याबद्दल सहांच्या माध्यमातून होणारा निषेध नोंदविण्यांत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. वेदांता-फॉक्सकॉन हा प्रकल्प पुन्हा महाराष्ट्रात आणण्यासाठी शासन दरबारी कळविण्यात यावे.असे शिवसेना व युवासेनेतर्फे तहसीलदार रोहन शिंदे यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

शिवसेना तालुकाप्रमुख नौशाद दळवी, उपतालुकाप्रमुख चंद्रकांत मोहिते, तालुका संघटक कुणाल सतविडकर युवासेना विधानसभा अधिकारी - रुपेश रोटकर, युवासेना तालुका अधिकारी - विक्रांत कुबल, युवासेना शहर अधिकारी- प्रतीक उमरोटकर, महिला आघाडी संघटिका राजश्री मिसाळ, प्रमोद भायदे, बाळकृष्ण गोंजी,अभय दिवेकर, शैलेश पाटील यांसह पदाधिकारी, युवा सैनिक, शिवसैनिक उपस्थित होते.

# पाली - खोपोली काँक्रीट रस्त्यांचे काम दमदार की गमदार?

## नविन काँक्रीट रस्त्यांवर काहीच महिन्यांत खड्ड्यांचे साम्राज्य

**दै.रायगड नगरी । खोपोली**

पाली - खोपोली महामार्गाच्या रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचे काम २०१६ पासून सुरू आहे. गेल्या अनेक वर्षांपासून संथगतीने सुरू असलेले काम, रस्त्यावरील खड्डे आणि निकृष्ट दर्जाचे काम अशा विविध समस्येच्या गर्तेत हा महामार्ग सापडला आहे. त्यामुळे १९८ कोटी रुपयांचा चुराडा होताना दिसत आहे. या मार्गाचे काम सुरू झाल्यावर वाहनचालक व प्रवाशांना अत्यंत उत्तम दर्जेदार रस्ता मिळणार अशी अपेक्षा होती. मात्र, यावर पाणी फिरतांना दिसत आहे. सुरुवातीस हा मार्ग बनविण्याचे काम मोनिका कन्ट्रक्शनकडे होते. परंतु, निकृष्ट दर्जाचे व ढिसाळ कामामुळे त्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले.



आता नव्याने कंत्राटदाराचे कामदेखील निकृष्ट दर्जाचे व ढिसाळ असल्याचे निदर्शनास येत आहे. नव्याने बांधण्यात आलेला काँक्रीटच्या रस्त्याला अक्षरश: भेगा पडल्या असून अनेक ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. तर काही ठिकाणी रस्ता देखील खचला असल्याचे दिसून येत आहे.

पाली फाटा ते मिरकूट वाडी गावापर्यंत रस्त्यावरील जागोजागी सोडण्यात आलेले पॅचवरील काँक्रिटीकरणाचे काम पावसाला सुरुवात होण्याआधी करण्यात अले होते. नव्याने तयार केलेल्या काँक्रीटच्या रस्त्याला पाणी न मारल्यामुळे रस्त्यांचा दर्जा ढासळत चालला आहे. खड्डे आणि निकृष्ट रस्त्यांमुळे अपघातांमध्ये वाढ होत आहे. अशा असंख्य कारणांमुळे या मार्गावरून प्रवास करणे अवघड झाले असल्याचे प्रवासी वाहन चालकांसह ग्रामस्थांकडून बोलली जात आहे.

या रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे शासनाचे कोट्यवधी रुपये पाण्यात जाणार असल्याचे दिसत आहे. आधीचा डांबरी रस्ता बरा होता, असे म्हणावे लागत आहे.

शासन कोट्यवधी रुपये खर्च करते, पण रस्त्यांच्या गुणवत्तेकडे लक्ष का देत नाही? ठेकेदार काम करीत असताना एमएसआरडीसीचे इंजिनियर उभे असून देखील रस्त्यांच्या कामाला दर्जा का मिळत नाही? चार ते पाच महिन्यांतच काँक्रीट रस्त्याला भेगा पडून खड्डे पडण्यास सुरुवात का झाली आहे? पाली फाटा ते मिरकुटवाडीपर्यंतच रस्त्यांला खड्डे रस्ता खचणे व भेगा पडायचे नक्की काय कारण आहे? गणेशोत्सवासाठी कोकणाकडे जाणाऱ्या प्रवासी वाहनांमुळेच हा रस्ता चार दिवसांत फुटला की काय? या निष्कृष्ट दर्जाच्या कामाची सखोल चौकशी करून योग्यशीर कारवाई करण्यात यावी. कारवाई न झाल्यास तिव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनचे महाराष्ट्र राज्य मार्गदर्शक पैलवान जेष्ठ पत्रकार हनुमंतराव ओव्हाळ यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे.

> पाली - खोपोली महामार्गाच्या रुंदीकरण व काँक्रिटीकरणाच्या कामाची सखोल चौकशी करून योग्यशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केंद्रीय मंत्री नितिन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात येणार आहे. रस्त्यांची चौकशी होवून योग्य ती कारवाई न झाल्यास अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन, पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली (भारत) व रायगड संघर्ष समितीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. ऐवढेच नव्हे तर मी वयाच्या ७२ व्या वर्षी देखील जिवाची बाजी लावून जनतेच्या होणाऱ्या फसवणुकीविरोधात आमरण उपोषण करेन. रायगड जिल्हाधिकारी, पाली तहसीलदार, खालापुर तहसीलदार यांनी देखील याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, ही विनंती.
>
> **- जेष्ठ पत्रकार पैलवान हनुमंतराव ओव्हाळ अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन महाराष्ट्र राज्य**

# रायगड जिल्ह्यातील खेळाडूंचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सत्कार

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या रायगड जिल्ह्यातील खेळाडूंचा जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात आज सत्कार करण्यात आला. यावेळी खेळाडू तसेच त्यांचे प्रशिक्षक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांच्या हस्ते कु.आकांक्षा दिलीप नित्तुरे (टेनिस) - खेलो इंडिया स्पर्धांमध्ये मध्ये रौप्य पदक, एशियन टेनिस टूर स्पर्धा विजेती, राष्ट्रीय टेनिस स्पर्धा विजेती, आर्यन अरुण पाटील (उंच उडी) जागतिक शालेय अजिंक्यपद स्पर्धा सहभाग, खेलो इंडिया स्पर्धांमध्ये मध्ये रौप्यपदक, पश्चिम विभागीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदक, अब्राहम खासदा (३००० मी) पश्चिम विभागीय स्पर्धांमध्ये विक्रमासह सुवर्णपदक, प्रांजल राजाराम कुंभार (कुस्ती ५८ किग्रॅ) - मुंबई विद्यापीठ सुवर्णपदक विजेते व अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा, पायल संतोष मरागजे (कुस्ती ५० किग्रॅ) मुंबई विद्यापीठ सुवर्णपदक विजेते व अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा, कु.सोहेल शेख (कुस्ती ४४ कि ग्रॅ) ग्रीकोरोमन प्रकारामध्ये राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्य पदक, अभिजित सिंग (१०० व २०० मी. धावणे) पश्चिम विभागीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदक या खेळाडूंचा तर श्री.राजाराम कुंभार (कुस्ती प्रशिक्षक) कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती केंद्र, खोपोली ता.खालापूर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी या खेळाडूंना मार्गदर्शन करुन भविष्यातील क्रीडा स्पर्धांमध्ये अधिक चांगली कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन दिले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, जिल्हा क्रीडा अधिकारी (प्रभारी) सुहास व्हनमाने, मार्गदर्शक श्री.पद्माक्षण, मार्गदर्शक आशिष घायडे, श्रीम. दिपा नित्तुरे, तालुका क्रीडा अधिकारी श्रीम.अंकिता मयेकर, सचिन निकम, कुस्ती मार्गदर्शक संदिप वांजळे, सिध्दार्थ खंडागळे, प्रफुल पाटील, सुरेंद्र कांबळे इत्यादी उपस्थित होते.